शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेतील नवनिर्मित ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७६००/- आहे अशा पदांना मंत्रिमंडळाची मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०१४/(प्र.क्र.७३/१४)/तांशि-५,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम काम रोड,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै, २०१९

<u>संदर्भ</u> :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.मान्यता- २०१४/ प्र.क्र.७३/१४/तांशि-५, दिनांक २१/१२/२०१७.
२) वित्त विभाग उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक २६ ऑक्टोंबर,२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पदनि-२०१७/प्र.क्र.६५/१७/आ.पु.क., दिनांक ७/११/२०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून विद्युत अभियांत्रिकी व स्थापत्य अभियांत्रिकी असे २ नवीन पदवीका अभ्यासक्रम प्रत्येकी ६० प्रवेशक्षमतेने सुरु करण्यात आले आहेत. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार तेथे आवश्यक २१ शिक्षकीय पदे निर्माण करण्यास उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक २६/१०/२०१७ रोजी झालेल्या क्र. ०४/२०१७ व्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरून २१ पदांच्या निर्मितीचे आदेश संदर्भ क्र.१ येथील दिनांक २१/१२/२०१७ च्या आदेशांन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक ७/११/२०१७ रोजीचे इतिवृत्तात नवीन पदनिर्मितीच्या प्रस्तावामध्ये ग्रेड वेतन रु.७६००/- किंवा त्यापेक्षा जास्त ग्रेड वेतनाची पदे असतील असे प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी विभागाने सादर करण्याबाबत नमूद केले आहे.

उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक २६/१०/२०१७ रोजीचे बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेतील रु.७६००/- किंवा त्यापेक्षा अधिक ग्रेड वेतन असणारी एकूण ३ पदे निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी मान्यता दिली आहे. उक्त बाबींचा सर्वांगिण विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

उच्च स्तरीय सचिव समितीने त्यांचे दिनांक २६/१०/२०१७ रोजीचे बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार तसेच मंत्रिमंडळाने दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेतील रु.७६००/- किंवा त्यापेक्षा अधिक ग्रेड वेतन असणारी पुढील शिक्षकीय पदे निर्माण करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी (रु.)	मान्यता देण्यात आलेल्या पदांची संख्या
१	विभागप्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी	३७४००-६७०००, ग्रे.पे. ९०००	०१
२	विभागप्रमुख, उपयोजित यंत्रशास्त्र	३७४००-६७०००, ग्रे.पे. ९०००	०१
३	विभागप्रमुख, विद्युत अभियांत्रिकी	३७४००-६७०००, ग्रे.पे. ९०००	०१
एकूण पदे			**०३**

३. सदरचे पदनिर्मितीकरीता आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद विधीमंडळाच्या पुढील अधिवेशनात विहित मार्गाने करण्यात येईल, याचे अधीन राहून सदरचे पदनिर्मितीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. या करीता पूरक मागणीद्वारे निधी मंजूर झाल्याखेरीज या पदांवरील खर्च करण्यात येऊ नये.

४. शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया या संस्थेतील पदांच्या वेतनावरील खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात येईल.

"मागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३-तंत्रशिक्षण, -१०५ तंत्रनिकेतने,
(००)(०१) - शासकीय तंत्रनिकेतने (२२०३ ०२० २) ०१ वेतन"

५. हे आदेश वित्त विभागाचे मान्यतेने तसेच वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ४१३/आपुक, दिनांक ९/८/२०१७ आणि दिनांक २६/१०/२०१७ रोजी झालेल्या ०४/२०१७ व्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीमध्ये मान्यता दिल्यानुसार तसेच वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्र. ११९/आपुक, दिनांक १५/०२/२०१८ अनुसार आणि राज्य मंत्रिमंडळाने दिनांक १६ जुलै, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtgra.govt.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७३११२००२६६२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2019.07.31 12:11:27 +05'30'

(अ. र. काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपुर,
(संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मंबई-१/नागपूर-२,
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), मंबई-१/नागपूर-२,
६. निवासी लेखा परीक्षा, मुंबई,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदीया,
९. वित्त विभाग, व्यय-५/आपुक, मंत्रालय, मुंबई,
१०. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया
(संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत),
११. उच्च व तंत्र शिक्षण विभाग/कार्यासन क्रमांक तांशि- ३, ७, मंत्रालय, मुंबई,
१२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१३. मा.रा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१४. निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/तांशि-५.